## पालघर जिल्ह्याच्या प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांवरील (Coastal Zone Management Plans), २०१९ अंतर्गत पर्यावरण विषयक प्रत्यक्ष जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत

पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी जी.एस.आर.३७ (इ), दिनांक १८ जानेवारी, २०१९ रोजी नविन सागरी नियमन क्षेत्र (Coastal Regulation Zone- CRZ), २०१९ प्रसिध्द केली. सदरहू अधिसुचनेच्या तरतुदींनुसार केंद्र शासन प्राधिकृत्त संस्थेमार्फत सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Coastal Zone Management Plans - CZMPs) अद्ययावत / तयार करणे अपेक्षित आहे.

त्याअनुषंगाने, सदरहू काम महाराष्ट्र शासनाने नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (National Centre for Sustainable Coastal Management - NCSCM), चेन्नई, तामीळनाडु, या केंद्र शासन प्राधिकृत्त संस्थेस दिले होते.

नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट (National Centre for Sustainable Coastal Management - NCSCM), चेन्नई या संस्थेने पालघर जिल्ह्याचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे, २०१९ तयार करण्याचे काम पूर्ण केले आहे. त्याअनुषंगाने, सीआरझेड, २०१९ अधिसुचना मधील परिशिष्ट ४, परिच्छेद ६ नुसार पालघर जिल्ह्याचे उक्त प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे हे सर्व जनतेच्या सूचना, हरकती, आक्षेप आमंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने दिनांक १६-०१-२०२० रोजी mczma.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले आहेत.

सदर प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यावरील जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता तिवारी ऑडीटोरीयम, सोनोपंत दांडेकर कॉलेज, पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती .

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ४९/२०२० व्दारा पत्र क्रंजेडी/बीओ.(डब्लुपीसी)-बी/पीएच/२००९२५एफटीएस०१०१, दिनांक २५ सप्टेंबर, २०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) **जिल्हादंडाधिकारी—पालघर, जिल्हा-पालघर,**<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) **प्रादेशिक अधिकारी-ठाणे**<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,ठाणे<br>)महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी ( | - | **सदस्य** |
| ३) **उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२**<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>तारापूर | - | **समन्वयक** |

उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, तारापूर-२ तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, पर्यावरण विभागाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण तज्ञ व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षाच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबातची प्रस्तावाना विषद केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी असे सांगितले की, केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणातील बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १८/०१/२०१९ रोजी नवीन CRZ अधिसुचना २०१९ जाहिर केली आहे. सदर अधिसुचनेच्या तरतुदींनुसार केंद्र शासन प्रधिकृत संस्थेमार्फत सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे अद्यावत तयार करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने सदर काम राज्य शासनाने एन. सी. एस. सी. एम., चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेस दिले आहे.

एन. सी. एस. सी. एम., चेन्नई या संस्थेने पालघर जिल्हयातील प्रारुप सागरी किनारा व्यवस्थापन आराखडे, २०१९ तयार करण्याचे काम पूर्ण केलेले आहे. तृया अनुषंगाने CRZ अधिसुचना २०१९ मधील परिशिष्ट ४, परिच्छेद ६ नुसार, उक्त प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन हे जनतेचा सुचना / हरकतींसाठी आमंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने दिनांक १६/०१/२०२० रोजी शासनाच्या विविध संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे. सदर प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडयांवरील जनसुनावणीचे, आज मा. डॉ. माणिक गुरसळ (आय.ए.एस), मा. जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली आयोजन केले आहे. डॉ. राजेंद्र आ. राजपूत, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, ठाणे हे या समितीचे सदस्य असून ते या सुनावणीकरीता उपस्थित आहेत. संचालक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन हे देखील उपस्थित आहेत. या अगोदर ही जाहिर सुनावणी ०६/०३/२०२० व दिनांक २१/०३/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती. कोविड आपत्तीच्या पार्श्वभुमीवर सुनावणी पुढे ढकलण्यात आली. सदर जनसुनावणीची जाहिरात एक महिन्या अगोदर दिनांक ३०/०८/२०२० रोजी लोकसत्ता या मराठी वर्तमानपत्रामध्ये व इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जनसुनावणीच्या आयोजनाबाबत शुध्दीपत्र दिनांक २८/०९/२०२० रोजी लोकसत्ता या मराठी वृत्तपत्रात व इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. शासनाचे पत्र दिनांक १४/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार आजची जनसुनावणी ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दतीने आयोजित करण्यात आलेली आहे.

समन्वयक यांनी सांगितले की, वरील प्रारुप आराखडयांबाबत मप्रनि मंडळ कार्यालयास विविध सुचना, हरकती प्राप्त झालेल्या आहेत. उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सुचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी अथवा तोंडी स्वरुपात ते देऊ शकतात असे सांगितले, यानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली.

जिल्हा दंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष यांनी जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रारुप आराखडयाविषयी सादरीकरण करण्याची विनंती केली व सर्व जन समुहाला त्याचे काही आक्षेप, हरकती किंवा सुचना असल्यास ते नोंदविण्याचे आव्हान केले.

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत संचालक, श्री. नरेंद्र टोके यांनी प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडयांबाबत विस्तृत सादरीकरण केले.

यानंतर उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

१) **श्री जयेंद्र दुबळा,**
यांनी लेखी निवेदन सादर केले.

२) **श्री जगन्नाथ गणू वझे, मॅनेजिंग डायरेक्टर, चिंचणी सहकारी मच्छिमार सर्वोदय संस्था, तालुका -डहाणू, जिल्हा-पालघर –**
या पालघरच्या प्रारुप आराखड्याबाबत लोकांमध्ये प्रचंड गैरसमज, अज्ञान आहे. हातामध्ये माहिती नाही. तरी याबाबत लोकांना वस्तूस्थिती कळणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रारुप आराखड्याची कॅसेट करुन प्रत्येक मच्छीमारी संस्थेस, प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात त्या मराठीत अहवालासोबत उपलब्ध करुन दिल्यास गैरसमज दूर होतील.
बऱ्याच गावात ते कोणालाच समजलेले नाही. त्यात बरेच राजकीय पुढारी दिशाभूल करण्याचे काम करत आहेत. मच्छिमारांना अशी भिती आहे की त्यांचे घरे उठवण्यात येतील. तरी या प्रारुप आराखड्याची कॅसेट करुन मराठी अहवालासोबत प्रत्येक मच्छिमार संस्था, ग्रामपंचायत संस्थेस त्वरित उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे जे आराखडे आहेत, त्यात पूर्वीचे आराखडे व नविन आराखडे यांच्या प्रती जर मराठीत उपलब्ध करुन दिल्यास गैरसमज दूर होतील. तरी त्या त्वरित करुन देण्यात याव्यात अशी मी नम्र विनंती करतो.

नंतर जिल्हादंडाधिकारी कार्यालयातून सभागृहाबाहेर घोषणा देत असलेल्या उपस्थितांना आवाहन करण्यात येत असताना सांगण्यात आले की सकाळी ११.०० वाजल्यापासून जनसुनावणी सुरु असून अनेक स्थानिकांनी आपल्य सूचना, हरकती सादर केलेल्या आहेत. काहींनी स्वतः स्टेजवर येऊन सूचना, हरकती पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस सादर केल्या आहेत. तरी आपणास त्या सादर करावयाच्या असल्यास त्या देऊ शकता. त्याचप्रमाणे आपल्या सूचना वा आक्षेप हे आपण जिथे बसला आहात, तेथूनही मांडू शकता. कॉडलेस माईक आपणास तेथेही उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) **संभुस संकल्पना उदय व माझा मित्र शिवा थोरात** न्यायाधिकरणासमोर आमचे म्हणणे आम्ही ईमेलव्दारे कळविले आहे. लेखी निवेदनही दिलेले आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की प्रारुप किनारा आराखड्याबाबतीत, कांदळवनाबाबतीत जनतेच्या सहभागाशिवाय कुठलाही जागृत्ती कार्यक्रम होऊ नये. कारण ब-याच एड एजन्सीच, मिडिया प्रॉडक्शन हाऊसेस ह्या त्यांना वाटते तशा / त्यांच्या सोयीसाठी पर्यावरणाचे व्हिडिओ तयार करतात. त्यात वस्तुस्थिती, जनतेच्या भावना,यांचा अभावच असतो. जनतेच्या सहभागाशिवाय कुठल्या एड एजन्सीच, मिडिया प्रॉडक्शन हाऊसेसने कुठल्याही योजना, विकासयोजना याबाबत क्लीप्स, व्हिडीओ तयार करु नये. त्यांनी सांगितले की त्यांच्या निवेदनाची ते प्रत घेऊ शकले नाहीत, मात्र ती ईमेलवर सादर केलेली आहे.

यास येथे जिल्हादंडाधिकारी-पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी इंग्रजीत उत्तर दिले की जनसुनावणी बैठकीसाठी एकावेळी १०० व्यक्तींना सामाजिक अंतर (सोशल डिस्टंगसिंग) पाळून बैठकीस येण्याची सोय करण्यात आलेली आहे.

जिल्हादंडाधिकारी-पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी घोषणा केली की उपस्थितांमध्ये कोणी -ज्योती राजेश मेहेर, राजाराम शांताराम मेहेर, रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, जयकुमार रामकृष्ण भोयर, नारायण गोविंद पाटील ह्या व्यक्ती उपस्थित असतील, तर त्यांनी समक्ष येऊन जिल्हादंडाधिकारी-पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्यासमोर आपली बाजू मांडावी. संबंधित विभागाचा अभिप्राय घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात येईल.

पर्यावरण समितीने व अन्य अधिकारी व कर्मचारी यांनी सभागृह न सोडता जेवणास थोडा वेळ घेतला.

**दुपार सत्र**

जिल्हादंडाधिकारी-पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत घोषणा केली की आज दि. ३०/०९/२०२० रोजी, मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९३२५३/२०२० यामध्ये याचिका कर्त्यांची प्रार्थना मान्य करुन त्यांची बाजू मांडण्याची संधि दिलेली आहे. तरी ते त्यांच्या सूचना, हरकती मांडू शकतात.

आज मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९३२५३/२०२० अंतर्गत निर्णय दिला आहे, त्यात मा. उच्च न्यायालयाने काही निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे नासिक फोरमचे प्रतिनिधी, महाराष्ट्र मच्छिमार कृत्ती समितीचे प्रतिनिधी, ठाणे जिल्हा मच्छिमार समितीचे प्रतिनिधी, ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार संस्थेचे प्रतिनिधी यांना त्यांची बाजू प्रत्यक्षपणे मांडणाच्या सूचना दिलेल्या आहेत. तरी ज्योती राजेश मेहेर, राजाराम शांताराम मेहेर, रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, जयकुमार रामकृष्ण भोयर, नारायण गोविंद पाटील यांनी आपली बाजू जिल्हादंडाधिकारी -पालघर यांच्यासमोर मांडू शकता. आपणास जी संधि देण्यात आलेली आहे, ती आपण घ्यावी. मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले असल्याने कृपया त्यांना कोणीही अडवू नये. तरी आपण आपली ओळख देऊन आपल्या भावना उपस्थित कराव्यात. आपण केलेल्या सूचना, हरकती/सुचना, आक्षेपांचा बैठकीच्या इतिवृत्तात समाविष्ट करुन संबंधित विभागाची नोंद घेऊन शासनास सादर करण्यात येतील.

**४) श्री रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, अध्यक्ष, ठाणे जिल्हा मच्छिमार समाज संघ,पालघर, जिल्हा-पालघर:-**

श्री रामकृष्ण तांडेल यांनी सांगितले की नॅशनल फोरम, महाराष्ट्र मच्छिमार समिती, ठाणे जिल्हा मच्छिमार संघ, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी संघ व वाळवण विरोधी कृत्ती समिती पाच संघटना मिळून या महिन्याच्या १२ तारखेला निवेदन दिले. ऑनलाईन सुनावणी रद्द् करण्याची कारणे दिली होती. त्यात ग्रामीण भाग असल्याने नेटवर्क नाही, तांत्रिकदृष्ट्या अडचणी, नागरिकांना सहभाग नाही, व त्यापेक्षा विनंती करण्यात आलेली होती की ऑनलाईन जनसुनावणी घेण्याची कायद्यात तरतुद नाही. हे सर्व मुद्दे जिल्हादंडाधिकारी – पालघर यांना दिले होते, पण जिल्हादंडाधिकारी – पालघर सकारात्मक दिसले नाहीत. त्यामुळे पाच संघटनाच्या पाच व्यक्तींनी ज्योती राजेश मेहेर, राजाराम शांताराम मेहेर, रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, जयकुमार रामकृष्ण भोयर,

नारायण गोविंद पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. नंतर दुस-या दिवशी जिल्ह्याचे लोकप्रतिनिधींसोबत जिल्हादंडाधिकारी-पालघर यांच्याकडे चर्चा केली असता असे सांगण्यात आले की ऑनलाईन सुनावणीबरोबरच १०० व्यक्तींच्या समुहाबरोबर बैठक घेण्यात येईल. जास्त लोक असले तर त्याप्रमाणे १०० व्यक्तींचे सत्र घेण्यात येईल असे सांगितले. लोकप्रतिनिधींनी १०० व्यक्तींची अट असल्याने बऱ्याच लोकांना संधी नाकारली जाईल असे मत मांडले.

याअगोदर ही सुनावणी प्रथम ६ मार्च तारखेला सुनावणी घोषित झाली, पण आपल्या कार्यालयाने ७ मार्च तारीख लिहिली. त्यामुळे सामान्य जनतेस त्रास झाला. २२ मार्चची जनसुनावणी बैठक ही लॉक डाऊनमुळे रद्द झाली. जर करोना मुळे रद्द केली तर आता करोनाचा प्रादुर्भाव असतानाही मग जनसुनावणी ऑनलाईन लावण्यात आली. त्याच्याविरुध्द आम्ही याचिका दाखल केली. न्यायालयाच्या आदेशाशी अधिन राहून आम्ही येथे सांगतो की ही जनसुनावणी बेकायदेशीर आहे. सादरीकरणातील माहिती तयार करताना स्थानिक व्यक्तींना व गावांना विश्वासात घेतलेले नाही. अनेक गावे नकाशात दाखविलेली नाही. मच्छिमाराच्या जागा दाखविलेल्या नाहीत. मी केळवे गावाचा रहिवाशी असून तेथील किल्लाही दाखविलेला नाही. बोटींच्या जागा, कांदळवन व वाळवण जागाही दाखविलेल्या नाहित. हे अनंत काळपर्यंत चालणारे या प्रारुप आराखड्यामुळे विस्कळीत झालेले आहे. त्यामुळे स्थानिक जनतेचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे. सर्व नकाशे हे इंग्रजीत दिलेले आहे. ते मराठीत द्यावेत. नकाशाची साईजही छोटी दिलेली आहे. त्याप्रमाणे स्थानिकांना उत्तर देण्यास चेन्नई संस्थेचे प्रतिनिधी उपलब्ध आहेत काय? ते म्हणाले की परत विनंती करण्यात येते की ही जनसुनावणी रद्द् करण्यात यावी व आम्ही आमचे हक्क शाबित ठेवत आम्ही प्रतिपादन करतो की याचिकेत आम्ही आमची म्हणणे मांडणार आहोत. त्यांनी पर्यावरण समितीस आपली ओळख देण्याची विनंती केली.

समितीने व उपस्थित अधिकारी वर्गाने आपली ओळख करुन दिली.

श्री तांडेल यांनी आक्षेप नोंदविला की नकाशा बनविणाऱ्या चेन्नाई संस्थेचे एकही प्रतिनिधी हजर नाहित. जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आपली बाजू मांडण्याची सूचना केली. सर्व खुलासा करण्यात येईल.
श्री तांडेल यांनी आक्षेप नोंदविला की नकाशे बनविणारे नाहीत. ते गावातही आलेले नाहीत. जनसुनावणीसही आलेले नाहीत. मग उत्तर आम्हांला कशी मिळणार? आमचा त्यावर आक्षेप आहे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण उपस्थित करत असलेल्या सर्व मुद्द्यांची इतिवृतात नोंद घेण्यात आलेली आहे. श्री तांडेल यांनी आक्षेप नोंदविला की नकाशे बनविणारे नाहीत. ते गावातही आलेले नाहीत. जनसुनावणीसही आलेले नाहीत. याची नोंद इतिवृतात घेण्यात यावी.

५) <u>ज्योती राजेश मेहेरे,</u>

त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की सीझेडएमपीची जी ऑनलाईन व ऑफलाईन जनसुनावणी आज घेतली जात आहे, त्यास आमचा विरोध आहे. कोरोना प्रादुर्भाव असताना जनसुनावणी लावणे हेच मुळात चुकीची आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव काळात एकत्र येण्यास परवानगी नसल्यामुळे आम्ही पाच संघटेनेचे प्रतिनिधी आपणास जनसुनावणी रद्द करण्यास भेटण्यास आलो होतो. तरीही आजची सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. ज्या संस्थेने हे

नकाशे बनविले, त्यांचे कोणी प्रतिनिधी नाही. त्यांनी गावात येऊन नकाशे बनविलेले नाही. ए.सी. आफिसमध्ये बसून नकाशे बनविले आहेत. किनारपट्ट्ची पहाणी केलेली नाही. स्थानिक प्रशासनाबरोबर, ग्रामपंचायत तलाठी सर्कल यांच्याशी चर्चा केली नाही. उच्चतम भरती व ओहोटी वेळा, याचा अभ्यास केलेला नाही. बोटी शाकारणाच्या जागा, ह्या मसुद्यात आहेत पण नकाशात नाही. नकाशांचा आकार कमी असल्याने वाचताच येत नाही. सागरी किनाऱ्यावर आमचा निवासी हक्क अबाधित राहण्याचा कुठेच उल्लेख आरखडयात नाही. वस्ती, दाट वस्ती, गाव विस्तारासाठी लागणारा जागा याचा उल्लेख नाही. सीआरझेड कायदा, २००८, २०११, २०१८ व २०१९ यात बऱ्याच वेळा सुधारणा झाल्या. समुद्रकिनाऱ्याचे अस्तित्वच नष्ट करण्याचा प्रयत्न झालेला आहे. ब्रेक वॉटर, गाव, वाड्यावस्ती, मोकळ्या जागा, त्याठिकाणी वेगळे रंग दाखविलेले पट्टे नकाशात सारख दिसतात. नकाशे अपूर्ण आहेत. म्हणून आमचा विरोध आहे. सीझेडएमपीचे नकाशे तयार करण्याअगोदर येथे वैज्ञानिक सर्वेषण करणे गरजेचे होते, ते केलेले नाही, म्हणून आमचा विरोध आहे. हा आराखडा रद्द् करुन जनसुनावणी ही रद्द व्हावी अशी आमची मागणी आहे.

६) <u>श्री राजेन्द्र शांताराम मेहेर, महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती, पालघर, जिल्हा — पालघर —</u>

श्री मेहेर म्हणाले की आज पालघर जिल्ह्याच्या सागरीकिनारपट्टी विभाग व्यवस्थापनबाबत आज जनसुनावणी होत आहे. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून काही आक्षेप नोंदवत आहे. कोरोना प्रादुर्भाव असल्याने जनसुनावणी पुढे ढकलली. आता कोराना असतानाच ऑनलाईन व ऑफलाईन बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. जर कोरोनामुळे त्यावेळेस जनसुनावणी पुढे ढकलली, तर आता आम्ही जीव धोक्यात घालून आक्षेप नोंदविण्यास आलेलो आहोत. याठिकाणी ज्या संस्थेने नकाशे बनविले, त्यांचे कोणीही प्रतिनिधी आलेले नाहीत. पालघर किनारपट्टी ही बहुभाषिक असून सर्व जातीधर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. येथील सातपाडी हे गाव ५०% नकाशात नाही. तेथे ६,००० घरे आहेत. तर फक्त ३,५०० घरेच दाखविली आहेत. तरी जिल्हादंडाधिकारी-पालघर यांनी प्रांत, तलाठी व जनसुनावणी समितीतील प्रतिनिधी यांनी गावाची पहाणी करुन हक्क अबाधित ठेऊन नकाशा बनविला असता तर स्थानिकांना पाठिंबा दिला असता.

सर्व नकाशे हे मराठीतच हवे. त्याचप्रमाणे प्रत्येक गावाची जनसुनावणी ही वेगळी परत घेण्यात यावी किंवा तालुका स्तरावर ती वेगवेगळी घेण्यात यावी.

७) <u>नारायण गोविंद पाटील, अध्यक्ष, वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती -</u>

सदरहू सुनावणीस आमचा तीव्र आक्षेप आहे कारण ही बेकायदेशीर आहे. ज्या चेन्नईच्या संस्थेने नकाशे बनविले, त्यांनी महाराष्ट्राचा ७२० कि.मी. समुद्र किनाऱ्याचा सर्वेषण केले असते, स्थानिक स्वराज्य संस्थांना विश्वासात घेऊन केले असते तर ठीक होते. त्यांनी त्यांच्या ऑफिसमधून ते तयार केले. भरपुर चुका असलेले नकाशे आहेत. जनसुनावणीस उत्तर देण्यास त्या संस्थेचा एकही प्रतिनिधी उपस्थित नाही. बरीच गावे, पाडे, वसत्या, मच्छीमारांची वाळवण जागा, विस्तारीत गाव जागा दाखविलेली नाही. समुद्रातली पगार (खडकाळ भाग), सुरुची बागा दाखविलेले नाही. तरी नविन नकाशे ग्रामपंचायतींना देऊन, अभ्यास करुन प्रसिध्द करणे आवश्यक आहे. आम्ही येथे माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आलेलो आहोत. तरी ही बेकायदेशीर सुनावणी त्वरित थांबवावी.

सर्व आक्षेपांची पूर्णता करुन पुढील जनसुनावणी ही गावागावात घ्यावी. सर्वेषण करुन दुरुस्त्या करुन नकाशे बनवावेत. ह्या जनसुनावणीविरुध्द न्यायालयात जाण्याचा आम्ही हक्क अबाधित ठेवतो.

८) **<u>श्री जयकुमार रामकुमार भोयर, माजी जिल्हाध्यक्ष, पालघर –</u>**

करोनाचा वाढता प्रादुर्भाव होत असताना ही जनसुनावणी ही स्थानिकांवर लादलेली आहे. कोरोना काळात सर्व नियम पाळण्याचे, घरी राहण्याचे शासनाचे निर्देश आहेत. जर कोणी कोरोनाने बाधित झाले, तर त्यास शासनच जबाबदार राहिल. इंग्रजांच्या काळापासून आमचे कोळीवाडे आहेत व आम्ही किनारपट्ट्वर राहतो. ज्यावेळी कायदा झाला नव्हता,तेव्हापासून आम्ही तेथे राहतो. १९५० साली कायदा आला. आज जे आराखडे केले आहेत, ते ग्रामपंचायत व मच्छिमारी संस्थाना विश्वासात घेऊनच केलेले नाहित. ते केले असते, तर एवढा उद्रेक झाला नसता. आमचा कोळी समाज हा भोळा समाज आहे. त्याचा गैरफायदा कोणी घेतल्यास परिणाम वाईट होतील.

९) **<u>प्राध्यापक गजानन भूषण भोईर,</u>**

त्यांनी बैठकीत एक मुलाचा बाप म्हणून मुलासाठी पोटतिडकीने बोलणारा आहे असे सांगितले. प्राध्यापक भोईर यांनी पृथ्विच्या वाढत्या तापमानाचा परिणाम, अंटार्किकावरिल बर्फ वितळणे, सैबेरियात वणवे लागणे, पृथ्वीवर चक्रीवादळे वाढणे याबाबत उपस्थितांना माहिती दिली. त्यांनी आताच्या सांयटिफिक कम्युनिटीस जे स्वतःचे फायदा बघतात, त्यांना दोष दिला. त्यांनी सांगितले की सातपाडीत अर्धा गावात समुद्र शिरला. 10 अब्ज लोकांच्या राहण्याचा प्रश्न निमार्ण होईल व समुद्र बेदखल करेल. वाढवण बंदराचा परिणाम याबाबत माहिती दिली.

१०) **<u>श्री रामकृष्ण तांडेल,</u>**

सदरहू जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे, त्यामुळे ती त्वरित रद्द करण्यात यावी, त्यासाठी त्यांनी विविध कारणे सांगितली. मासेमारी गावे सीझेडएमपी नकाशात दाखविलेली नाहीत. मच्छिमार लोकांना 500 मीटर मध्ये राहण्याचा अधिकार आहे तो राहू शकतो. ब्रेक वॉटर बांधल्यामुळे भरतीच्या वेळी पाणी येते परंतु त्याचा उल्लेख नाही. बीचसाठी जागा नाही. खाडी व नदीचा उल्लेख नाही. सीझेडएमपीचा नकाशा बनविला आहे तो तांत्रिक दृष्टया चुकीचा आहे. बीचसाठी जागा नाही. खाडी व नदीचा उल्लेख नाही.

११) **<u>श्री वैभव अशोक वझे, राहणार – डहाणू</u>**

आरखडा बनविले आहेत ते उपस्थित नाही त्यामूळे ही जनसुनावणी आम्हांला मान्य नाही. कारण सीझेडएमपीचे प्रतिनिधी आमच्या आक्षेपांना उत्तर देण्यास उपलब्ध नाहित. ही जन सुनावणी मान्य नाही.

१२) **<u>श्री. जॉन परेरा, राष्ट्रसेवा दल, पालघर-वसई –</u>**

आमच्या जनसुनावणी बैठक रद्द करणाच्या आमच्या पत्राला साधे उत्तरही जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून पाठविण्यात आलेले नाही.

त्यांनी सदरहू जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केली. हॅलिकॉप्टरमधून शुटींग करित फोटो घेतले व अहवाल सादर केलेला आहे असे वाटते. वाढवण बंदर दाखविलेले नाही, किल्ला नाही. त्यामुळे अहवाल तयार करताना ते गंभीर नव्हते असे वाटते. भांडवलशाही धोरण येथे वाटते. तरी ही जनसुनावणी त्वरित रद्द् करावी व आराखडे व नकाशे त्वरित दुरुस्त करुन सुनावणी परत घेण्यात यावी.

१३) श्री मानेंद्र आरेकर, गांव — वडराई, जिल्हा-पालघर —

ज्या गावांतून या प्रारुप सागरी किनारा आराखड्यास विरोध आहे, ती गावे नकाशात दाखविलेली नाही.

१४) श्री जगदीश नाईक, राहणार — सातपाटी, जिल्हा-पालघर -

विरोध सर्वांचाच आहे. मात्र गा-हाणे मांडले, लेखी सूचना मांडल्या तर त्याची पोच मिळत नाही.

१५) श्री भूपेन्द्र राऊत, राहणार-डहाणू, जिल्हा-पालघर -

हे प्रारुप सागरीकिनारा आराखडा व्यवस्थापन योजना हे बिनकामाचे प्रशासनाचे उद्योग आहेत. याची जनतेला गरज नाही. कोरोना चालू असताना बैठक बोलावणे चुकीचे आहे.

१६)पोर्णिमा माणिक मेहेर, रा. वडराई, जिल्हा-पालघर

सीआरझेड व सीझेडएमपी या दोघांचा संबंध या जिल्ह्याशी येतो. 48 मच्छिमार गाव आहे व या जिल्ह्यात अनेक समुदाय गुण्यागोविंदाने राहत आहेत. जिल्ह्यात महिलांच्या मच्छिमारीच्या जागा आहेत. पालघर जिल्ह्याच अनेक महिला या शिंपले, कालवे वेचून विकत असतात. त्या त्यांच्या उदरनिर्वाहाच्या जागा त्यांना राखीव ठेवणे योग्य असून त्या नकाशात दाखविण्यात आलेल्या नाहीत. त्या दाखविण्यात आल्या पाहिजेत.

तरी हे नकाशे ग्राह्य धरण्यात येऊ नये. कारण हे नकाशे बेकायदेशीर आहेत. म्हणून ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. कारण —

अ) या गोष्टींकडे सकारात्मक पाहण्यासाठी बेकायदेशीर काम करणाऱ्या लोकांमध्ये प्रथम जागृत्ती होणे आवश्यक आहे,

ब) तो ससेमिरा केंद्र सरकारने सुरु केलेला आहे. कारण त्यांना आता समुद्र पाहिजे. येथे दुसऱ्या अर्थाने सागराचे औद्योगिकीकरण चालू आहे,

क) बारा नॉटिकल मैल समुद्राचे औद्योगिकीकरण करण्याचा डाव आहे,

तरी जनतेच्या मागणीचा विचार करुन सदरहू जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी.

१७) <u>श्री रामकृष्ण तांडेल -</u>

अ) ठाणे, रायगड, मुंबई येथील जनसुनावणी ह्या रद्द करुन परत आयोजित करण्यात आलेल्या होत्या. तर पालघर येथील का नाही?

ब) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बैठक योग्य नाही. पण तरीही ती घेतली. पण उत्तर देण्यास संस्थेचा कोणीही प्रतिनिधी नाही. म्हणजे जनसुनावणीचा मूळ उद्देश जनतेस प्रकल्पाची माहिती देणे हा पाळला जात नाही. तर ही जनसुनावणी कायदेशीर आहे का?

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी-पालघर यांनी उत्तर दिले की आपण मुद्दे मांडावेत. इतिवृतात त्याचा उल्लेख करण्यात येईल.

जिल्हादंडाधिकारी-पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मी २९ रोजी लगेचच सर्व प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी यांना कळविले आहे. कायद्याच्या तरतुदींनुसार ३० दिवस अगोदर सूचना देणे बंधनकारक आहे. ती रद्द करण्यात आली. मात्र १४ सप्टेंबर, २०२० च्या केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे ऑनलाईन बरोबरच

ऑफलाईनही जनसुनावणी घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. कोरोनाच्या प्रादुर्भाव टाळण्यासाठी १०० व्यक्तींच्या समुहाला सामाजिक अंतर व मुखपट्टी घालून बैठक आयोजित करणे व जास्त उपस्थिती असल्यास १००-१०० व्यक्तींची समुहास बैठकीस बोलावणे. या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

जिल्हादंडाधिकारी या नात्याने जिल्ह्यातील जनतेच्या भावना जाणण्यासाठी ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी म्हणून सुनावणीतील मुद्दयांची नोंद घेण्यात आल्यावर ते शासनास सादर करण्यात येतील. प्रत्येक तालुक्याबाबत काही त्रुटी असल्यास आपणास विनंती आहे की दहा मिनिटे सादरीकरण बघावे. आपल्या भावना पोहचविण्याचे काम आहे. आजच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देश आहेत की आपणास सुनावणी संधि द्यावी. तरी आपण सुसंगत मागणी करावी. आपल्या भावना शासनास पोचविण्याचे काम जिल्हादंडाधिकारी या नात्याने पूर्ण करण्यात येईल.

यावेळी श्री तांडेल यांनी मुद्दा उपस्थित केला की जर संबंधित संस्थेचे अधिकारीच जनतेस उत्तर देण्यास उपस्थित नाहित, तर ती जनसुनावणी कायदेशीर कशी होऊ शकते? ऑफलाईन बैठकीची सूचना ही २८ सप्टेंबर, २०२० म्हणजे फक्त दोन दिवस अगोदर कळविलेली आहे. यासाठी ३० दिवसांची आगाऊ सूचना देणे आवश्यक होते. कोरोनामुळे बैठकीस येण्यास परवानगी मिळणार नाही असे सर्वांना वाटत होते. नाही तर येथे हजारो लोक आले असते.

श्री तांडेल यांनी दोन्ही मुद्द्यांचे निरसन होणे आवश्यक असल्याचे सांगितले –

१) जर जनसुनावणीस संबंधित संस्थेचे प्रतिनिधी उत्तर देण्यास नाहित, तरी सदरहू जनसुनावणी ही कायदेशीर कशी असू शकते?

२) जनसुनावणी आयोजित करण्याच्या दोन दिवस आधी ऑफलाईनसुध्दा जनसुनावणी घेण्यात येईल हे कायदेशीर कसे असू शकते?

जनसुनावणीस आगाऊ ३० दिवस सूचना देणे बंधनकारक आहे.

**प्राध्यापक गजानन भूषण भोईर,** म्हणाले की जर जनसुनावणी समिती ऑफलाईन उत्तर देऊ शकत नाही, तर ऑनलाईन काय देणार?

३) जनसुनावणी ही जनतेसाठी आहे. जर आराखडा बनविणारे आलेले नाहीत व सामान्य जनतेस उत्तर देऊ शकत नसतील, तर सदरहू जनसुनावणी ही कायदेशीर कशी असू शकते?

जिल्हादंडाधिकारी-पालघर यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेले मुद्दे शासनास कळविणे हे या समितीचे उद्दिष्ट आहे.

१८) **मिस मणी** यांनी सांगितले की पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या १४ स्पटेंबर, २०१६ च्या अधिसूचनेनुसार जनसुनावणीस प्रकल्प प्रवर्तकांचे प्रकल्प सल्लागार उपस्थित असावे व त्यांनी उपस्थितांना प्रकल्पाची संपूर्ण माहिती द्यावी असे निर्देश आहेत. कोरोना काळात ऑनलाईन जनसुनावणी ही कायदेशीर असते, तर संबंधित चेन्नई प्रतिनिधी ऑनलाईन येऊन जनसुनावणीत उत्तर देऊ शकले असते. त्यावेळी संचालक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन तथा

1

सदस्य सचिव, एमसीझेडएमए यांनी सांगितले की संबंधित प्रतिनिधी कोरोनाने क्वारनटाईन आहेत, पण ते ऑनलाईन उपलब्ध आहेत.

**१९) श्री तांडेल यांनी मुद्दा उपस्थित केला की**

अ) जर चेन्नई प्रतिनिधी कोरोनाबाधित म्हणून आले नाहीत. जर चेन्नाई प्रतिनिधींची गैरहजेरी कायदेशील आहे, तर दोन दिवस अगोदर ऑफलाईन जनसुनावणी माहिती जनतेस देणे (तीस दिवसाऐवजी), कशी कायदेशीर?

ब) कोरोनाबाधित चेन्नई संस्थेचे प्रतिनिधी असल्याने आजची जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी,

जिल्हादंडाधिकारी-पालघर यांना सांगितले की जनसुनावणीची संधि मिळाली आहे. तर आपल्या भावना आवरा व नविन मुद्दे घ्या.

श्री तांडेल यांनी सांगितले की प्रत्येक मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपातील असतील तर चेन्नई प्रतिनिधी गैरहजेरी कायदेशीर आहे की नाही व जिल्हादंडाधिकारी यांना जनसुनावणी पुढे ढकलण्याचा अधिकार आहे वा नाही. खुर्चीवर बसलेले न्यायदंडाधिकारी व न्यायपीठासन अधिकारी आहेत.

२०) **श्री पाटील, वाढवण गाव** यांनी मत मांडले की शासकीय अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरही जनसुनावणी ही रद्द करण्यात येऊ शकते.

**२१) श्री राकेश राऊत, वाढवण गाव** यांनी मत मांडले की कायदेशीर वा बेकायदेशीर, तर असा अध्यक्ष नेमावा की त्याला कायदेशीर वा बेकायदेशीर ठरविण्याचा अधिकार असेल.

**२२) श्री जॉन परेरा, पालघर-वसई** यांनी मत मांडले की आम्ही असा अर्थ घ्यायचा का की स्थानापन्न अधिकाऱ्यास कायद्याचे ज्ञान नाही. निरुत्तर आहेत याचा अर्थ ही जनसुनावणी ही बेकायदेशीर आहे.

श्री तांडेल यांनी मत मांडले की जनसुनावणी ही जनाची सुनावणी आहे. जर शासन/सरकार जनतेचा पैसा असा खर्च करत असेल, तर तो आमचा खर्च आहे. जोपर्यंत नकाशात दुरुस्त्या होत नाही, तोपर्यंत जनसुनावणी ही रद्द असे घोषीत करावे. जनसुनावणी समिती ही शांत बसलेली होती.
उपस्थितांनी ही लोकशाहीची अधिकाऱ्यानी केलेली गळचेपी असे म्हणत घोषणा केली की जोपर्यंत सुनावणी रद्द म्हणून अध्यक्ष, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती घोषणा देत नाही, तोपर्यंत सभागृहात ते ठिय्या आंदोलन करणार, जरी रात्रभर बसावे लागले तरी बसणार.

जिल्हादंडाधिकारी-पालघर यांनी मत मांडले की जनसुनावणी ही संविधानमान्य प्रक्रिया (Statutory Process) आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मुद्दे मांडावेत. ही जनसुनावणी ही विविध पध्दतीने करता येते. उत्तर देण्याचा अधिकार नाही. आपली बाजू, भावना शासनास कळवणार.
जनसुनावणी रद्द करा ही जनतेची भावना आहे तरी ती रद्द करावी, मात्र उपस्थित केलेल्या प्रश्नांचे उत्तर द्या. ऑनलाईन व ऑफलाईन यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली होती. शासन जनतेचे पैसे खर्च करत आहे. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने चेन्नई संस्थेस किती पैसे दिले याबाबत मुद्दा उपस्थितांनी केला.

त्याचप्रमाणे उपस्थितांनी असे मत मांडले की जनसुनावणी समिती ही उत्तर देण्यास बांधिल आहे. त्यावेळी प्राध्यापक गजानन भूषण भोईर यांनी सांगितले की गोव्यात सतत तीन दिवस जनसुनावणी झाल्या आहेत. जिल्हाधिकारी यांना जनसुनावणी सोडून जाण्याचा अधिकारी नाही. जनसुनावणी सुरु करण्याची वेळ ही सकाळी ११.०० वाजता लिहिली आहे. मात्र जनसुनावणी बंदची वेळ लिहिलेली नाही.

जनसुनावणी संपते. ती रद्द करा नाही तर विचारलेल्या तीन प्रश्नांचे उत्तर द्या. माननीय सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार तीन समिती नकाशे बनविण्यास स्थापित कराव्यात. त्याचप्रमाणे, जिल्हा पातळीवर तीन सदस्य समिती नकाशे करण्यासाठी स्थापन करावी.

संध्याकाळी ६.०० वाजता, सर्व उपस्थितांचे म्हणणे व हरकती ऐकून घेतल्यानंतर, मा. जिल्हादंडाधिकारी -पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जनसुनावणी बैठक ही सकाळी ११.०० वाजता सुरु करण्यात आली. बैठकीत जिल्हादंडाधिकारी, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सदस्य सचिव, एमसीझेडएमए (पर्यावरण विभाग), निवासी उपजिल्हाधिकारी-पालघर, प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ ठाणे, तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय व उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ-पालघर – समन्वयक इत्यादी अधिकारी उपस्थित होते. जनसुनावणी ही ऑनलाईन व ऑफलाईन अशी दोन्ही प्रकारे झाली. आज दि. ३०/०९/२०२० रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९३२५३/२०२० अंतर्गत निर्देश दिल्याप्रमाणे सर्व व्यक्तींना वेळ देण्यात येऊन त्यांचे प्रत्यक्ष म्हणणे ऐकण्यात आले. त्याचप्रमाणे अनेक लेखी सूचना, हरकती ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या आहेत. या बैठकीत अनेक सूचना, आक्षेप नोंदविण्यात आले. या बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन तो अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात येईल. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

(सुजीत डोलम)
समन्वयक, पर्यावरणविषयक
जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी –
तारापूर-२,
मप्रनि मंडळ ,तारापूर

(डॉ. राजेन्द्र राजपुत)
सदस्य, पर्यावरणविषयक
जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ ,ठाणे

(डॉ. माणिक गुरसळ),
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी, पालघर

12:7 NOV 2020

जिल्हा दंडाधिकारी पालघर * जिल्हा पालघर *